क्रमांक १५३

**महाराष्ट्र विधानसभा**
**पत्रक भाग दोन**

**गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २० शके, १९४७**

**१५३.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरिता दिनांक ०८ ते १९ डिसेंबर, २०२५ या कालावधीतील विभागाकडे तारांकित स्वीकृत प्रश्न पाठविण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार, दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाचा कालावधी सोमवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ ते रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजीपर्यंत निश्चित करण्यात आला आहे. सोमवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहात शोक प्रस्ताव असल्याने प्रश्नोत्तराचा तास होणार नसल्यामुळे उपरोक्त दिवसाची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चेकरीता तसेच मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चेकरीता ठेवण्यात येत आहे.

सन २०२५ च्या तृतीय अधिवेशनातील दिनांक ८ ते १२ डिसेंबर, २०२५ या पहिल्या आठवडयातील वस्तुस्थिती, वस्तुस्थिती व सदस्य खुलासा करिता विभागाकडे पाठविलेले प्रश्न तसेच दिनांक १५ ते १९ डिसेंबर, २०२५ या दुसऱ्या आठवड्यातील दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजीचे तारांकित स्वीकृत प्रश्न वगळून इतर सर्व प्रश्न आणि दिनांक २२ ते २६ डिसेंबर, २०२५ या कालावधीसाठीचे तिसऱ्या आठवडयातील कार्यवाहीत घेतलेले सर्व प्रश्न म.वि.स.नियम २० अन्वये व्यपगत करण्यात आले आहेत.

**विधान भवन,**
**नागपूर.**
**दिनांक : ११ डिसेंबर, २०२५**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**प्रति :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष यांना अग्रेषित.

(४) संगणक कक्ष (वेबसाईट) व MKCL कक्ष.